वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. १८ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# मनोज जरांगे पाटलांची जय हो...

## मराठा आरक्षण विरोधातील पहिली याचिका फेटाळली

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



मुंबई, (दिव्य न्युज):- आताच्या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. मराठ्यांना हैदराबाद गॅझेटियरनुसार आरक्षण देण्याबाबतच्या सरकारच्या जीआरला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. याबाबतच्या निर्णयाविरोधात हायकोर्टात जीआरला विरोध करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. वकील विनित धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज हायकोर्टात दोन सत्रात सुनावणी पार पडली. हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. यानंतर हायकोर्टाने विनित धोत्रे यांची याचिका ग्राह्य धरण्याजोगी नाही, असं म्हणत याचिका फेटाळली. त्यामुळे मराठा समाजासाठी हा सर्वात मोठा दिलासा मानला जात आहे.

याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेमधील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल तर त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असं म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली. पण यावेळी मुंबई हायकोर्टाने एक महत्त्वाची मुभादेखील दिली आहे. याचिकाकर्त्यांनी वरच्या न्यायालयात जावं किंवा जीआरविरोधात इतर रिट याचिका ज्या दाखल करण्यात आल्या आहेत त्या इंटरलिंक करण्याची मुभा कोर्टाने दिली आहे.

सरकारकडून महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी मुंबई हायकोर्टात युक्तिवाद केला. शासन निर्णयाने शेड्यूल कास्टमधील कुणीही बाधित नाही, अशी माहिती महाधिवक्तांनी कोर्टात दिली. त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच जनहित याचिका ग्राह्य धरण्यास पात्र नाही, असं हायकोर्टाने स्पष्ट केलं. तसेच जनहित याचिकेच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीला आव्हान दिलं जाऊ शकत नाही, असंही हायकोर्ट म्हणालं.मराठा आरक्षणाचा नवा जीआर लागू झाल्यानंतर ओबीसी ▸▸ पान २ वर

### मुख्याधिकारी साहेब, चेंबर सोडा, सर्व विभागाला भेटी द्या

# न.प.चा वसूली विभाग बनला लुटारूंचा अड्डा

### गट क्रं.३/१७, ३/१८ मध्ये लुटीचा कारभार सुरू



भाग १




## पैसे द्या, कोणतेही नामांतर करून घ्या

बीड, (दिव्य न्युज):- मागील मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या अंदाधूंद गैर कारभारामुळे नगर पालिका भ्रष्टाचाराचा अड्डाच बनला होता. बीड नगर पालिकेच्या सर्वच विभागात पैसे दिल्याशिवाय एकही काम होत नव्हते. बांधकामा विभाग असो कि पाणी पुरवठा विभागा किंवा नगर रचना विभाग असो की वसूली विभाग किंवा स्वच्छता विभाग किंवा भंडार विभाग या सर्व विभागात कोट्यावधी रूपयांचे गैर आणि बोगस कामे झाली असून भंडार विभागाने तर बोगस खरेदीचा भंडारच फोडले आहे. स्वच्छता विभागात कामे न करता अनेक बोगस बिले उचलनिण्यात आली असून न.प.च्या मालकीच्या असलेल्या दोन जेसीबींवर टायर खरेदी आणि दुरूस्तीच्या नावावर लाखो रूपयांचा चुराडा झालाअसून या पैशामध्ये नवीन जेसीबी खरेदी करता आल्या असत्या. आजचा विषय वसूली विभागा असून आता रोज नगर पालिकेच्या प्रत्येक विभागाची निता अंधारे यांच्या कार्यकाळात झालेल्या बोगसगिरीची पोलखोल करण्यात येणार आहे. मुख्याधिकारी साहेब तुमची एसीची कॅबिन सोडा आणि प्रत्येक विभागात बसून त्यामध्ये झालेल्या बोगसगिरीची आणि गैर कामांची माहिती घ्या... ▸▸ पान २ वर

# घोटाळेबाज ६३२ शिक्षक, मुख्याध्यापक तुरुंगात जाणार?

### शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठ्या घोटाळ्याची चौकशी




मुंबई , (दिव्य न्युज):- शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठा भ्रष्टाचार म्हणून राज्यभर गाजणाऱ्या बोगस शालार्थ आयडी घोटाळ्यात अडकलेल्या संशयित ६३२ शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा संचालकांची झाडाझडती मंगळवारपासून अखेर सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी ५० शिक्षकांना सुनावणीस बोलावून त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. हे नियुक्तीबाबतच्या कागदपत्रांची पुर्तता न करू शकणाऱ्या शिक्षकांवर काय कारवाई होईल, हा चर्चेचा विषय आहे.

शिक्षण आयुक्तांनी शाळा आयडी घोटाळा प्रकरणात संशयित शिक्षकांची सुनावणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करण्याचे आदेश दिले आहेत. ही सुनावणी उपसंचालक पातळीवर होत असून, उपसंचालकांनी यासाठी एक समिती गठित केली आहे. या समितीत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) येथील अधिकारी समाविष्ट आहेत. डाएटच्या कार्यालयातच ही ▸▸ पान २ वर

## काकडहिरा येथून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ

### सरपंच प्रीती बागलाने यांच्या कार्याचे कौतुक




बीड , (दिव्य न्युज):- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान म्हणजे गावोगावी सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारी आणि स्पर्धात्मक विकासाला चालना देणारी एक मोठी लोकचळवळ आहे. या अभियानामुळे ग्रामीण विकासाला नवसंजीवनी मिळणार आहे, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला.बीड तालुक्यातील काकडहिरा येथे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा ▸▸ पान २ वर

## नेकनूर परिसरात चोरांचा धुमाकूळ

### दुचाकी लंपास मात्र टवेरा चोरण्याचा प्रयत्न फसला

नेकनूर, (दिव्य न्युज):- नेकनूर शहरात गुरुवारी पहाटे चोरट्यांनी धुमाकूळ घालून नागरिकांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह उभे केले. केज मार्गावरील सय्यद नगर येथे पहाटे तीनच्या सुमारास दुचाकीवर आलेल्या दोन चोरट्यांनी सय्यद मोहीब यांच्या घरासमोरील टवेरा गाडीचे लॉक तोडून पान २ वर




# स्वस्त धान्य क्र.३१ च्या दुकान चालकाला तहसिलदार, पुरवठा अधिकाऱ्यांचा आशिर्वाद आहे का?

### दुकानचालक कार्ड धारकांचे अन्न गिळू लागला, या काटेला आता जिल्हाधिकाऱ्यांनी चांगलाच टाका लावणे गरजेचे

बीड, (दिव्य न्युज):-बीड शहरातील पालवण चौक येथे स्वस्त धान्य दुकान क्रं. ३१ असून भले मोठ्या गेटवर दुकानाचे फलक लावलेले असून कधीही जा त्या दुकानाचे गट बंदच असते. दुकान चालाक काटेंना फोन लावला तर फोन उचलत नाहीत. अशा या मगरूरीत असणाऱ्या दुकान चालक काटेंना तहसिलदार, पुरवठा अधिकाऱ्यांचा आशिर्वाद तर नाही ना? अशी कार्ड धारकांना वाटत आहे. म्हणूनच कार्ड धारक भिती पोटी कोणाकडेच याची तक्रार करत नाही. काही कार्डधारकांनी आमच्याकडे या दुकानदाराचे अन्नगिळूपणाचा पाडा वाचला आहे.

### स्वस्त धान्य दुकान क्रं.१ ची ही लवकरच भांडाफोड

स्वस्त धान्य दुकानादाराकडे बीड शहरातील विविध भागातील कार्डधारक आहेत. अंदाजित काही हजारांपेक्षा कार्डधारक या दुकानाला जोडून देण्यात आलेले आहेत. तहसिलदार, पुरवठा अधिकारी, गोडाऊ ▸▸ पान २ वर



प्रतिकात्मक



भाग १

## दुकान क्रं.३१ दुकानामध्ये बीड शहरातील कार्ड धारकांची संख्या,कोणाकडेच राशन कार्ड उपलब्ध नाही, आपल्याला किती धान्य मंजूर आहे आणि दुकानदार किती देतो याचे कार्ड धारकांना काहीच ताळमेळ नाही

# धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकण्याची प्रशासनावर नामुष्की

## सोमवारी सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा लक्ष्यवेधी आंदोलन– डॉ.गणेश ढवळे

बीड, (दिव्य न्युज):- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड दौऱ्या दरम्यान नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावरील एसबीआय बँकेजवळ असलेल्या धोकादायक विद्युत रोहित्राला कपड्याने झाकून ठेवण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या मधोमध असणारे हे रोहित्र व विजेचे खांब नागरिकांच्या जीवाला धोका ठरत असून अपघातांच्या घटनाही घडलेल्या आहेत.

सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ बीड जिल्हा डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी याविरोधात वारंवार निवेदने व आंदोलन केले तरी महावितरण व नगरपरिषद प्रशासन जबाबदारी झटकत आहेत. नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात प्रशासनाने रोहित्र झाकून ठेवून प्रश्न झाकण्याचा प्रयत्न केला मात्र नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे.

नगरनाका ते कृषी कॉलनी हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून येथे नाट्यगृह, दवाखाने, शाळा, शिकवण्या असल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. अशा गर्दीच्या मार्गावर रस्त्याच्या मधोमध उघडे रोहित्र व लोंबकळणाऱ्या तारांमुळे अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.या गंभीर प्रश्नाकडे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी (दि.२२) त्याच ठिकाणी सेल्फी विथ रोहित्र हॅशटॅग अजितदादा हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले.





पान ४ वरून

### दंडे खाल्लं, कोर्टानेही

आंबेडकर नगर येथेच मंजूर आहेत असे असतानाही सदर रेल्वे स्टेशन पालवन येथे म्हणजे बीड शहराच्या ७ ते ८ कि.मि. दुर बांधण्यात आले आहेत, त्यामुळेच लोकांची गैरसोय झाली आहे, पालवन रेल्वे स्टेशनवरून नगरला जाण्यासाठी चाळीस रुपये लागणार आहेत तर बीड शहरातून पालवण स्टेशनवर जाणेसाठी शंभर ते दीडशे रुपये खर्च होणार आहेत म्हणून पालवन रेल्वे स्टेशन नागरिकांना परवडणारे नाही म्हणून बार्शी नाका इमामपुर रोडवरच रेल्वे स्टेशन (थांबा) झालेच पाहिजे यामध्ये नागरिकांसह रेल्वेचाच फायदा होईल, बार्शी नाक्यावरून मोंढा. कृषी उत्पन्न बाजार समिती. एमआयडीसी. आठवडी बाजार. आडत मार्केट. बसस्टॅन्ड. जिल्हाधिकारी कार्यालय. तहसील कार्यालय. समाज कल्याण ऑफिस. पोस्ट ऑफिस. जिल्हा रुग्णालय. एसपी ऑफिस. जिल्हा न्यायालय. शासकीय दूध डेरी. महिला रोगणालय. बीड जिल्हा क्रीडांगण. ऐतिहासिक हिंदू मुस्लिम धार्मिक स्थळे. आणी जवळपास ९५ टक्के शाळा महाविद्यालय हे बार्शीनाका इमामपुररोड रेल्वे रेल्वे स्टेशन पासून जवळच आहेत म्हणून बार्शीनाका रेल्वे स्टेशन लोकांच्या फायद्याचे आहेत म्हणून सर्व पक्षीय लोकांनी लढा सुरू केलेला आहे. बार्शीनाका रेल्वे स्टेशन आंदोलनाचेच एक भाग म्हणून जोपर्यंत लोकांच्या सहुलतीचे रेल्वे स्टेशन बार्शी नाक्यावर होत नाहीत तोपर्यंत मी बीडच्या रेल्वेतून प्रवास करणार नाही. आणि आता यापुढे बार्शीनाका रेल्वे स्टेशन साठी बार्शीनाका रेल्वे स्टेशन कृती समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या जोरावर संपादक गम्मत भाऊ भंडारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली तिव्रगतीने बार्शी नाका इमामपूर रेल्वे स्टेशन कृती समिती आंदोलन उभे करणार आहोत असे पत्र बार्शी नाका रेल्वे स्टेशन कृती समितीचे कार्य अध्यक्ष खुर्शीद आलम यांनी दिले आहे,

### आरोपीविरुद्ध

पोलिस अधीक्षक आणि शिवाजी नगर पोलिसांना निवेदन दिले होते. त्यात, पोलिस प्रशासनाने आरोपींसोबत संगनमत करून चुकीचा अहवाल दिल्याचा आरोप त्यांनी केला होता. आरोपींनी त्यांना बेदम मारहाण केल्याचेही त्यांनी निवेदनात म्हटले होते. या प्रकरणी न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी १५ सप्टेंबर रोजी दिला होता. या निवेदनानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने पोलिसांना नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, कोणतीही कारवाई न झाल्याने उबाळे यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. दिवसभर तो इमारतीवरच असल्याने परिसरात मोठी गर्दी जमली होती.

### विसर्जनवेळी खड्ड्यांना

होता तसाच खड्डेमय झाला आहे. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीपूर्वी हजारो भाविकांच्या गर्दीचा विचार करून नगरपालिकेने तातडीने खड्डे बुजवले होते. मात्र, या कामाचा दर्जा इतका निकृष्ट ठरला की काही दिवसांचा पाऊसही सहन करू शकला नाही. परिणामी शहरवासीयांना पुन्हा एकदा खड्ड्यांच्या त्रासाला सामोरं जावं लागत आहे. वाहनधारकांना या मार्गावरून डुलत–डुलत प्रवास करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासन विसर्जनापुरतंच जागं होतं का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, दीर्घकालीन उपाययोजना न करता दरवर्षी केवळ सणासुदीच्या पार्श्वभूमीवर टचप करून दिखावा केल्याचा आरोप प्रशासनावर होत आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती कधी होणार, हा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे.फ

### ‘दुपारी मी सिमेंट

क्षीरसागर, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, आरोग्यसेवेच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत आदींची प्रमुख उपस्थिती होती. कॅथलॅबमध्ये २४ तास कार्यरत कार्डिओलॉजिस्ट व भूलतज्ज्ञ व डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. कॅथलॅबमध्ये अँजिओग्राफी, अँजिओप्लासटी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १० बेडचे आयसीयू असून कार्डियाक इको कार्डियोग्राफीची सोय करण्यात आली आहे.

### ‘राजस्थानी मल्टीस्टेट

बंद करणार आली होती यामुळे शहरातील नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्यामुळे संबंधित संचालकावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. मागील काही दिवसांपूर्वी मल्टीस्टेटचे चेअरमन चंदुलाल बियाणे तसेच संचालक यांना अटक करण्यात आले असून, यापैकी दोन संचालकांना नांदेड येथे अटक करण्यात आले होते. संबंधित संचालकांना धाराशिव जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने ताब्यात घेऊन दि. १७ रोजी उमरगा न्यायालय हजर करण्यात आले असता संचालक बद्रीनारायण बाहेती व प्रेमलता बाहेती यांना न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या निमित्ताने धाराशिव जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपाधीक्षक अश्विनी भोसले यांनी जनतेला आव्हान करून सांगितले की खाजगी संस्थेमध्ये आर्थिक व्यवहार करत असताना अथवा आर्थिक गुंतवणूक करत असताना संबंधित मल्टीस्टेट संस्था, सहकारी पतसंस्था, सहकारी बँका इत्यादीची पार्श्वभूमी तपासूनच आर्थिक गुंतवणूक करावी जेणे करून कष्टाच्या पैशाला कोणत्याही प्रकारचे ग्रहण लागणार नाही व आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता जिल्ह्यातील तमाम नागरिकांनी घ्यावी अशी आवाहन आर्थिक गुन्हे शाखा च्या पोलीस उपाधीक्षक अश्विनी भोसले यांनी केले आहे.

काय आहे प्रकरण?

राजस्थानी मल्टीस्टेटमध्ये ज्यादा व्याजाचे आमिष दाखवून ठेवी जमा केल्या मात्र, त्यानंतर उमरगा येथील शाखेसह सर्व शाखा बंद करत संचालकांनी पोबारा केला. कष्टाचा पैसा बुडण्याच्या स्थितीत आल्यानं ठेवीदारांमध्ये संतापाची लाट उसळली. दरम्यान, अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांच्यासह सर्व संचालक मंडळावर ठेवीदारांचे जवळपास ३०० कोटी रुपये बुडवल्या प्रकरणी विविध ठिकाणी गुन्हे दाखल आहेत.

### सीएस साहेब जिल्हा

त्याठिकाणी काही दलालांनी त्या रुग्णाच्या नातेवाईकांना गाठले व तुमचा रुग्ण गंभीर आहे त्याला सरकारी दवाखान्यात योग्य उपचार मिळणार नाही अशी भीती दाखवून सिटीस्कॅनमधूनच त्या रुग्णाला खासगी रुग्णालयात घेवून गेले. जर त्या रुग्णाच्या डोक्याला मार लागला होता तर त्या रुग्णाला नियमाने न्यूरोसर्जन यांच्या रुग्णालयात घेवून जाणे अपेक्षित होते परंतु त्या दलालांनी मेडिसिन, नेत्ररोग व अस्थिरोग तज्ज्ञ अशा रुग्णालयात त्या रुग्णाला दाखला मिळवून दिला. एकंदरीत हा टक्केवारीचा प्रकार वाटत असून जिल्हा शल्यचिकित्सक यांनी या गंभीर प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्याची गरज भासत आहे.

---

पान १ वरून

### मनोज जरांगे

समाजातील नेते मंडळी आणि अभ्यासकांमध्ये नाराजीचा सूर बघायला मिळाला. अनेक ओबीसी नेते नाराज झाले. त्यांनी हायकोर्टात जाण्याची तयारी केली. अनेकांनी हैदराबाद गॅझेटियरच्या नव्या जीआरला कोर्टात आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी पहिली याचिका वकील विनित धोत्रे यांनी दाखल केली होती. यानंतर अनेकांनी याचिका दाखल केल्या आहेत. हायकोर्टाने पहिल्या जनहित याचिकेवर आज सुनावणी घेत ती याचिका फेटाळून लावली आहे. पण मराठा आरक्षणाच्या नव्या जीआरला विरोध करणाऱ्या इतर याचिंकांबाबत हायकोर्ट काय निर्णय घेणार? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

### न.प.चा वसूली

तुम्ही कार्यात्यात आठ आठ तास बसून राहिले तरी पालिकेतून बोगसगिरी थांबणार नाही. म्हणून आता अंग झटका एसीची कॅबीन सोडा आणि प्रत्येक विभागात जावून बैठका घेवून त्यांनी केलेल्या कामाची बारकाईने चौकशी करा तेव्हाच तुमच्या लक्षात येईल की किती प्रमाणात कोण कोणते गैर कामे कोण कोणत्या बील कलेक्टरांनी वसूली विभागात केले आहेत. तुमच्या नगर पालिकेचा वसूली विभाग तर नागरीकांना लुटण्याचा अड्डाच बनला असून त्या ठिकाणी लुटारू अधिकाऱ्यांमुळे नागरीक नाहक लुटले जात आहेत. पीटीआर गट क्रं. ३/१७, ३/१८ ने तर बोगसगिरीची सर्वच मर्यादाची सिमा ओलांडली असून या विभागात तर बोगसगिरीचा नंगा नाच सुरू आहे. पैसे मोजा आणि कोणत्याही प्रकारचे, कशाही पध्दतीचे नामांतर करून घ्या मागच्या तारखेत काही छाटछूट पत्रकारांना हातीशी धरून जाहिर प्रगटन प्रसिध्द केले जात असून त्या मोबदल्यात त्या पेपरवाल्यांना हजारो रूपये मोजले जात आहेत. मागच्या तारखेत आवक नं. टाकायचे आणि जुन्या तारखेमध्येच अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेवून नामांतर करायचे. त्या बिल कलेक्टरांनी मागील मुख्याधिकाऱ्यांना हा टेबल मिळविण्यासाठी लाखो रूपये मोजल्याची माहिती आहे. या विभागाचा बील कलेक्टर हे निलंबत झाले होते. पुन्हा रूजू करून घेण्यासाठी मुख्याधिकारी निता अंधारे यांनी स्वतःच्या घरात बसून आर्थिक देवाण घेवाण करून या बील कलेक्टरला पुन्हा रूजू करून घेत मलाई खाण्याचे टेबल दिले. दिलेले पैसे काढण्यासाठी या बील कलेक्टरांनी बोगसगिरीची सर्व सिमा ओलांडली असून मागच्या सात ते आठ महिन्यात झालेल्या नामांतराची आणि बांधकाम कामाची नोंद घेतल्याची माहिती घ्या. तुमच्या सर्व लक्षात येईल की कशा पध्दतीने या बिल कलेक्टरांनी गैर कामे करून प्लॉट धारकांना फसविले आहे. बापाची मिळकियत मुलाच्या नावे करायची, मुलाच्या नावाची मिलकियत इतर भावांच्या नावाची करायची किंवा नातेवाईकाच्या नावे करायची. पैसे घेवून कोणतेही गैर कामे या विभागात सुरू असून मागच्या तारखेत सर्व गोंधळ सुरू असून या बिल कलेक्टराला वसूली विभागातील अधिकाऱ्यांचा आशिर्वाद असून या अधिकाऱ्यांनाही या बिल कलेक्टरांकडून मोठ्या प्रमाणात पैशांचा पुरवठा केला जात असून याकडे कोणाचेच लक्ष नाही. याच संधीचा फायदा उचलत बील कलेक्टर आणि वसूली विभागातील अधिकारी संधीचे सोने करत पिवळे झाले असून त्यांच्या घराची तिजोरीही या बोगस गिरीच्या पैशातून तुडूब भरली आहे. या विषयाची सविस्तर पोलखोल बातमी लवकरच प्रकाशित करण्यात येईल.

### घोटाळेबाज ६३२

सुनावणी सुरू आहे.

शालार्थ घोटाळ्यामध्ये जिल्ह्यात बनावट कागदपत्रांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. शालार्थ आयडीच्या माध्यमातून त्यांना वेतनसुद्धा सुरू करण्यात आले होते. या प्रकरणात सायबर पोलिसांकडे गुन्हा दाखल असून आतापर्यंत २० अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापकांना अटक करण्यात आली आहे. शिक्षण आयुक्तांच्या आदेशानुसार संशयित शिक्षकांची सुनावणी आता उपसंचालक पातळीवर होत आहे. शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी प्रथम संबंधित शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य व शाळा व्यवस्थापकांना नोटीस बजावली होती. त्यानुसार मंगळवार १६ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष सुनावणी सुरू झाली. बनावट शिक्षक नियुक्ती प्रकरणात उपसंचालक कार्यालय स्वतः तक्रारदार आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार या शिक्षकांचे शालार्थ आयडी उपसंचालक कार्यालयातून बनविल्याच गेलेले नाहीत. अनेक शिक्षकांची नियुक्ती बनावट कागदपत्रांच्या आधारे झाली आहे. अशा शिक्षकांना अयोग्य ठरविले जाऊ शकते, असा अंदाज आहे.

शिक्षकांची संख्या अधिक असल्याने पहिल्या दिवशी ५० शिक्षकांना सुनावणीसाठी बोलावण्यात आले. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. यात मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापकांचाही समावेश आहे. या प्रकरणात ६३२ शिक्षक संशयित असल्याने त्यांच्या सुनावणीस १२ ते १५ दिवस लागण्याची शक्यता आहे. सुत्राच्या माहितीनुसार बरेच शिक्षक शालार्थ आयडीबाबतचे पुरावे सादर करू शकलेले नाहीत. अधिकाऱ्यांच्या मते पुरावे सादर न करू शकणाऱ्या शिक्षकांना अयोग्य ठरवून त्यांची नियुक्तीही रद्द केली जाऊ शकते. त्यामुळे शिक्षकांची धाकधुक वाढली आहे.या प्रकरणाची गंभीरता पाहता संशयित शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा संचालकांची सुनावणी सुरू आहे. मंगळवारी ५० लोकांना सुनावणीस बोलाविण्यात आली. संख्या मोठी असल्याने टप्प्याटप्प्याने पंधरापेक्षा अधिक दिवस ही सुनावणी चालेल. ती पूर्ण झाल्याशिवाय या प्रकरणात काही सांगता येणार नाही. कारवाईबाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय होईल.

### काकडहिरा येथून

बुधवारी (दि.१७) शुभारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अजितदादा पवार हे बोलत होते. तसेच, काकडहिरा गावच्या सरपंच प्रीती बागलाने यांच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.व्यासपीठावर श्रीक्षेत्र नारायणगडचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, माजी कृषीमंत्री आ. धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, आ. विजयसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधासनभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सरपंच प्रीतीताई बागलाने, कल्याण आखाडे, अविनाश नाईकवाडे, राजेश्वर चव्हाण, नारायणगड संस्थानचे विश्वस्त दिलीप भोसले तसेच शासनाचे विविध अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, १७ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत हे अभियान राज्यभर चार पातळ्यांवर राबवले जाणार आहे. तालुका, जिल्हा, विभाग व राज्य अशा स्तरांवर ही स्पर्धा होणार असून, ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले. तसेच, ग्रामीण भागातील सर्वांनी मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. महिला सक्षमीकरण, ग्रामविकासासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असून, तुम्ही साथ दिलीत तर जिल्ह्याच्या विकासासाठी मी खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभा आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पांडुरंग सुतार यांनी केले तर आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी मानले.

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गावाचा विकास गतीने होईल–प्रीती बागलाने

प्रास्ताविक सरपंच प्रीती अमोल बागलाने यांनी केले. त्यांनी अभियानाचे स्वरूप स्पष्ट करून ग्रामपंचायतीने आतापर्यंत केलेल्या विकासकामांचा उल्लेख केला. तसेच, पुढील काळात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गावाचा विकास अधिक गतीने केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

शासकीय योजनांच्या लाभाचे वितरण

शासकीय योजना लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व लाभवितरणाचा कार्यक्रम झाला. यात मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या कै. बापूसाहेब दगडू कवडे यांच्या पत्नी श्रीमती राणी बापूसाहेब कवडे यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच आयुष्यमान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. महिला बचत गटांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे कर्ज आणि स्वयंसहायता गटांना देखील धनादेश प्रदान करण्यात आले.

### नेकनूर परिसरात

दरवाजा उघडला. गाडी सुरू करण्याचा प्रयत्न होताच सेंटर लॉकमुळे सायरन वाजला आणि चोरट्यांनी पळ काढला. हे सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. घटना इथेच थांबली नाही तर शिक्षक कॉलनी परिसरातून एका दुचाकीची चोरी झाल्याची माहिती पुढे आली असून, आणखी एका स्कॉर्पिओ गाडीला चोरण्याचा प्रयत्न सदर चोरट्यांनी केल्याचे उघड झाले आहे.

या सलग घटनांमुळे नेकनूर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर पातळीवर आला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले चोरटे अद्याप फरार आहेत. पोलिसांनी गस्त वाढवून तातडीने कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### स्वस्त धान्य क्र.३१

धारकाच्या अन्नात मापात पाप करणाऱ्या या स्वस्त धान्य दुकान क्रं. ३१ च्या दुकान चालकाला आता चांगलाच टाका लावावा लागेल आता पर्यंत या काटेंनी किती काटा मारला, किती कार्ड धारकांचे अन्न गिळून बसला, कोणत्या बाजारात विकला आता याचा हिशोब लावावाच लागेल. या दुकानदारानी पालवण चौक या ठिकाणी आपली क्रं.३१ ची दुकान थाटली असून भले मोठे गेट या दुकानासमोर असून त्याच गेटवर कुजलेल्या अवस्थेतेत दुकानाचे फलक लावण्यात आलेले आहे. दुकानात कोणतेच फलक नसून कार्ड धारकांची संख्या लावली नाही, एपीएल किती, बीपीएल किती, अंतोदय किती याची कोणतीच माहिती लावण्यात आलेली नाही. कोणत्या कार्ड धारकाला तांदुळ किती दिले जातात, गहू किती दिले जातात, याचे कोणतेच ताळमेळ दिसून येत नाही. या दुकानदाराकडे पालवण चौक परिसर वगळून इतर परिसरातील कार्ड धारक कसे ? ते कोणाच्या आशिर्वादाने जोडून देण्यात आले याची सखोल चौकशी करणे गरजचे असून आता या काटेंना चांगलाच टाका लावावा लागेल आणि या बाबत रितसर जिल्हाधिकाऱ्यांना भेटून या काटेंचा कारनामा जिल्हाधिकाऱ्यांसमोर वाचावा लागेल आणि काटेंचा भरलेला पापाचा घडा फोडावाच लागे.